# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/ ४८८७

दिनांक :- 29 DEC 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित

पदविका/पदवी व पदव्युततर पदवी

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- सन २०१७-१८ साठी विविध शिष्यवृत्ती योजनांकरीता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांचे संस्थांकडून प्राप्त अर्ज या कार्यालयास पाठविणे बाबत.**

संदर्भ :- मा.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तशिस/विका/डीबीटी पोर्टल/२०१७/२२८ दिनांक ०२/१२/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षिक वर्ष २०१७-१८ पासून शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आलेले आहे.

संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत विद्यार्थ्यांनी ऑन लाईन महाडीबीटी पोर्टलवरील भरलेल्या खालील योजनांचे अर्ज या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावे जेणे करून सदरील अर्ज या कार्यालयामार्फत संचालनालयास ऑनलाईन सादर करण्यात येतील.

१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२.डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.

**तसेच संस्थांना महाडीबीटी पोर्टलबाबत काही माहिती हवी असल्यास/काही अडचण असल्यास त्यासंबंधी संस्थांनी संचालनालयास थेट संपर्क न साधता या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा. आपल्या अडचणी या कार्यालयाकडून संचालनालयास सादर करण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- १. **मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Institute Later 2017-18